## निशाणी क्र. २८ वरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दावा मिळकतीची उपअधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडून मोजणी करुन मिळण्याकामी दाखल केलेला आहे.

२. वादी यांचे अर्जातील कथन असे आहे की, सदरचा दावा वादी यांनी दावा मिळकतीत प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण दुर करुन त्या खालील जागेचा खुला व प्रत्यक्ष ताबेकब्जा मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादींनी केलेल्या अतिक्रमित बांधकामाची अंदाजे मोजमापे त्यांनी दाव्यात नमुद केलेली आहेत. वादी हे मोजणी विषयातील तज्ञ नाहीत त्यामुळे दावा मिळकतीचे निश्चित कोणत्या भागात प्रतिवादींनी अतिक्रमण केले आहे याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे आवश्यक आहे. शेवटी वादी यांनी मा. उपअधिक्षक भूमि अभिलेख यांची दावा मिळकतीची मोजणी करण्याकामी नेमणुक करण्याची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी आपले म्हणण्यामध्ये असे कथन केले की, सदरचा अर्ज प्रकरणात विलंब व्हावा यासाठी दाखल केलेला आहे. मोजणी करण्यास प्रतिवादी यांचा आक्षेप नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे नुकसान टाळण्यासाठी लवकरात लवकर साक्षी पुरावा सुरु करावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

४. प्रस्तुतच्या अर्जातील कथने, प्रतिवादींचे म्हणणे व दाव्यातील कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीचे अर्जातील कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी दावा मिळकतीत अतिक्रमण करुन बांधकाम केलेले आहे. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण काढून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादीमध्ये असलेल्या वादाचे स्वरुप पाहता दावा मिळकतीची मोजणी झाल्याशिवाय वादाचे कायमस्वरुपी निराकरण होणार नाही म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. तालुका भूमी अभिलेख, खालापुर यांनी दावा मिळकतीची मोजणी करुन दावा मिळकतीच्या हद्दी निश्चित कराव्यात. दावा मिळकतीवर काही अतिक्रमण झाले आहे किंवा काय याबाबत प्रत्यक्ष पहाणी करुन अतिक्रमण झाले असल्यास त्याबाबतचा अहवाल व नकाशा या न्यायालयात पुढील तारखेपर्यंत दाखल करावा.

३. वादी यांनी मिळकत मोजणीसाठी लागणारी फी तालुका भूमी अभिलेख, खालापुर कार्यालयामध्ये भरावी. सदर कार्यालयात फी भरल्यानंतर पावतीची छायांकित प्रत या न्यायालयात दाखल करावी.

४. तालुका भूमी अभिलेख, खालापुर यांनी प्रस्तुत दाव्यात कोर्ट कमिशनर म्हणुन काम करत असताना दोन्ही पक्षकारांना व सह हिस्सेदारांना व लगतचे जमीन धारकांना नोटीसा देवुन त्यांचे समक्ष जागेची मोजणी करावी.

५. वादी यांनी तालुका भूमी अभिलेख, खालापुर यांना आवश्यक ती कागदपत्रे पुरवावीत.

६. तसे पत्र तालुका भूमी अभिलेख, खालापुर यांना देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2022.10.15 17:50:04 -0800

**खालापुरः** **( आर.डी.वाबळे)**

**दि. १५/१०/२०२२** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर खालापुर.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C.,<br>Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 15/10/2022 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 15/10/2022 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 15/10/2022 |